# टेक्नियम

निळू दामले

रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**टेक्नियम**
निळू दामले

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
निळू दामले
४१/४२, 'गुडविल', वनमाला टँक रोड,
माहीम, मुंबई- ४०००१६
फोन नं. ०२२-२४३०४७२०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३७०/-

मला मूल्याचं भान देणाऱ्या
माझ्या वडिलांना अर्पण

**ऋणनिर्देश**

गोपी कुकडे

मंगेश परब

समीर अन्नारकर

बाजी कुलकर्णी

सुधा कुलकर्णी

गिरीश मांडके

पुस्तकात ज्यांच्या मुलाखती आहेत ते सर्व

## टेक्नियम या पुस्तकाबद्दलचं निवेदन

टेक्नियम हे पुस्तक २००२ साली अक्षर प्रकाशननंच प्रसिद्ध केलेल्या 'टेलिवर्तन' या पुस्तकाचं सुधारित रूप आहे. 'टेलिवर्तन' या पुस्तकात भर घालून 'टेक्नियम' हे पुस्तक सिद्ध झालं आहे.

'टेक्नियम' या पुस्तकात टेलिव्हिजनचा भारतीय संस्कृतीवर झालेला परिणाम लातूर आणि वाराणसी या दोन जिल्ह्यांत, १९९८ च्या सुमाराला, तपासला होता. या पुस्तकाला विजय तेंडुलकर यांची प्रस्तावना होती. त्या पुस्तकातला मजकूर प्रस्तावनेसह या पुस्तकाच्या पहिल्या भागात आहे. जसाच्या तसा. फोटो मात्र वगळले आहेत.

२००७ साली म्हणजे आधीच्या फेरीनंतर सुमारे १० वर्षांनंतर त्याच ठिकाणी जाऊन शक्यतो त्याच माणसांना भेटून टेलिव्हिजन आणि भारतीय समाज यांच्या संबंधात काय फरक पडला आहे ते तपासलं. ते तपासताना काही जुनी माणसं शिल्लक नव्हती किंवा भेटू शकली नाहीत. तरी बहुतांश लोकांच्या भेटी झाल्या. टीव्हीबद्दलचे लोकांचे आक्षेप, शंका इत्यादी गोष्टी नाहीशा झाल्या होत्या. टीव्ही भारतीय समाज आणि संस्कृतीचा एक अविभाज्य भाग बनला होता; पण एक नवीनच गोष्ट घडली होती. इंटरनेट आणि सेलफोननं समाजात जोरात प्रवेश केला होता. आता माणसं इंटरनेट आणि सेलफोन याबद्दल आक्षेप आणि शंका घ्यायला लागली होती. संबंधित निरीक्षणं पुस्तकाच्या दुसऱ्या भागात मांडली आहेत.

२००७ ते २०१२ सालापर्यंत मी अनेक देशांत फिरलो. २००७ च्या फेरीतील निरीक्षणं लिहिणं आणि त्यांचं संपादन करत असताना, काहीअंशी त्यासाठी, मी अमेरिकेत होतो. तिथल्या ओहायो स्टेट विश्वशाळा, इलिनॉय विश्वशाळा (विश्वशाळा = युनिव्हर्सिटी) या दोन शाळांत माणसांना भेटत होतो आणि तिथलं तंत्रज्ञान आणि माणसं यांच्यातले संबंध अनुभवत होतो. तरुण मुलं

कॉम्प्युटरवर कायच्या काय प्रभावी सॉफ्टवेअर वापरून व्हर्च्युअल रिॲलिटीच्या मायावी जगात माणसं आणि घटना चितारताना पाहत होतो. सकाळी भारतातील परिस्थिती माझ्या लॅपटॉपवर लिहीत होतो आणि दुपारी अमेरिकेतल्या मुलांच्या लॅपटॉपवर काय चाललंय ते पाहत होतो.

सेलफोन आला, इंटरनेट आला म्हणजे केवढी मोठी टेक्नॉलॉजी भारतात आली असं भारतातली माणसं म्हणत होती. ते मी लिहीत होतो आणि त्याच वेळी अमेरिकेत माणसं कुठं निघाली होती ते पाहत होतो. विश्वशाळेचं सारं क्षेत्र वायफाय झालेलं होतं. मुलं मुली कुठंही बसून लॅपटॉप उघडून काम करताना दिसत होती. दिवसाच्या कोणत्याही तासाला. कॉफी हाऊसमध्ये, कँटीनमध्ये, तळ्याच्या काठी, उद्यानात, रस्त्याच्या कडेला एखाद्या बाकावर कुठंही. केव्हाही. व्हर्च्युअल रिॲलिटी, आभासी वास्तव विद्यार्थी आपल्या कॉम्प्युटरवर तयार करत होते.

तिथं माझं विमान उडालं. जगात तंत्रज्ञान कुठं निघालंय आणि जग कसं बदलणार आहे याचा विचार मी करू लागलो.

एक असतं भौगोलिक क्षेत्र. म्हणजे देश असतो, राज्य असतं. विश्वशाळा असते. आपण त्यात हिंडत असतो. त्यात माणसं भेटतात.

दुसरं क्षेत्र असतं विचारांचं, विषयांचं. त्याचा भूगोलाशी संबंध नसतो. त्या क्षेत्रात असतात प्रयोगशाळा, पुस्तकं आणि विचार करणारी माणसं.

मी तंत्रज्ञान या विषयाच्या क्षेत्रात भटकायला सुरुवात केली. तिथं खूप पुस्तकं आणि माणसं भेटली. मी चक्रावलो. तंत्रज्ञानावरची पुस्तकं वाचू लागलो आणि मी उडालोच. उद्याच्या घडू घातलेल्या जगाच्या शक्यतांनी मी चक्रावलो. नॉरबर्ट विनर, न्यूमन, फेनमन, डेक्सलर, लेनियर, केली, ब्रॅड, मोकिर, कुर्झवेल इत्यादी लोकांची पुस्तकं वाचली. माझ्या डोक्यात कल्पनांचा नुसता चिखल झाला.

टीव्हीचा परिणाम शोधत निघालो आणि कायच्या कायच टोकाला पोचलो. जितकं वाचतोय, जितकं पाहतोय, जितकं अभ्यासतोय तितका तितका मी जास्तीत जास्त गटांगळ्या खातोय.

त्या गटांगळ्या या पुस्तकाच्या तिसऱ्या भागात आहेत. केविन केलीनं आजच्या आणि उद्याच्या जगाचं वर्णन टेक्नियम या शब्दात केलंय. केविन

केलीचं म्हणणं आहे की, तंत्रज्ञान हे माणसाचंच एक अंग आहे. तंत्रज्ञान म्हणजेच माणूस. म्हणूनच केविन केली आपल्या सभोवतालच्या जगाला निसर्ग नव्हे, टेक्नियम असं म्हणतो. सारं जग तंत्रज्ञानानं भरलेलं, तयार झालेलं आहे. म्हणून तो जगाचं नाव टेक्नियम, टेक्नॉलॉजी या शब्दाचं असीम रूप, असं ठेवतो.

मीही या पुस्तकाचं नाव टेक्नियम ठेवलं आहे.

**– निळू दामले**